संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित,

डी.व्ही.एस.पी. मंडळ, दिग्रस द्वारा संचालित,

॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥
B.B. Arts, N.B.Commerce & B.P. Science College
DIGRAS, Dist. Yavatmal

# बापुरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व बापुसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ

नॅक द्वारा मानांकित ('ब' दर्जा)

# जलसाक्षरता व जलसंवर्धन विषयक प्रबोधन विशेषांक

# ज्ञानतुषार

वार्षिकांक २०१९-२०





# डी.व्ही.एस.पी.मंडळ, दिग्रस - कार्यकारिणी



श्री. विजयकुमारजी बंग
अध्यक्ष



श्री. श्याम महिन्द्रे (पाटील)
सचिव



डॉ. श्री. अभय पाटील
सचिव



डॉ. श्री. प्रदीप मेहता
उपाध्यक्ष



डॉ. श्री. चंद्रशेखर भोंगाडे
उपाध्यक्ष



श्री. पांडूरंग महिन्द्रे पाटील
उपाध्यक्ष



श्री. दिनेश भट
कोषाध्यक्ष



डॉ. श्री. श्रीकांत महल्ले
सभासद



श्री. कैलास बाजोरिया
सभासद



श्रीमती मीनाताई पाटील
सभासद



श्री. रघुराजसिंह चौहान
सभासद



श्री. अजय ढोले
सभासद



श्री. शेखर टाके
सभासद



श्री. विवेक बुटले
सभासद

# येथे कर अमुचे जुळती

## आमच्या संस्थेचे दिवंगत आधारस्तंभ



स्व.श्री.बापुसाहेब बुटले



स्व.श्री.नानासाहेब भट



स्व.श्री.बापुसाहेब पाटील



स्व.श्री.मारोतीराव पाटील



स्व.प्राचार्य एस.यू. चौहान



स्व.प्राचार्य एम.एम. महल्ले



स्व.श्री.सुधाकरराव पाटील



स्व.डॉ.एस.एस.भोंगाडे



स्व.श्री.एम.व्ही.ढोले



स्व.श्री.माधवराव पाटील



स्व.श्री.ईश्वरमलजी मेहता



स्व.श्री.प्रकाशराव बुटले



स्व.श्री. ज्ञानेश्वर पाटील

# अंतरंग — ज्ञानतुषार

## मराठी विभाग

२०१९-२०


| अ.क्र. | शीर्षक | विद्यार्थ्यांचे नांव | वर्ग | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | वर्तमान काळासाठी पाणी आणि भविष्यकाळासाठी पाणी जपुन वापरा | संजय सिताराम बिडवाल | बी.ए. १ | १ |
| २ | जल हेच जीवन | कु. रचना गजानन मनवर | एम.ए. १ | ३ |
| ३ | पर्यावरण दिन | कु. रचना गजानन मनवर | एम.ए. १ | ३ |
| ४ | पाणी | कु. शारदा केशव उकंडे | बी.ए. २ | ३ |
| ५ | घोटभर पाणी | कु. संस्कृती संतोष तायडे | बी.ए. १ | ४ |
| ६ | पाणी हेच जीवन | कु. सपना पंजाब परंडे | बी.ए. ३ | ४ |
| ७ | वृक्षसंवर्धन | कु. संस्कृती संतोष तायडे | बी.ए. १ | ४ |
| ८ | पाणी | कु. स्नेहा पंजाबराव वानखडे | बी.ए. ३ | ४ |
| ९ | जलसाक्षरता-जलसंवर्धन काळाची गरज | कु. कविता किसन चक्रे | बी.कॉम. ३ | ५ |
| १० | जलसाक्षरता | कु. अंकीता सुधीर धवने | बी.ए. १ (अ) | ७ |
| ११ | जलसंवर्धन | कु. कविता किसन चक्रे | बी.कॉम. ३ | ८ |
| १२ | पाणी बचतीचे जीवनमंत्र | कु. आयुषी विजय सरवैय्या | बी.एस्सी. ३ (बायो) | १० |
| १३ | कविता | कु. प्रणाली गजानन काटकर | बी.ए. ३ | ११ |
| १४ | पाणी | कु.वैशाली एल.एस. इंगोले | बी.ए. १ | ११ |
| १५ | जल हेच जीवन | स्वप्निल प्रल्हाद राठोड | बी.कॉम. २ | १२ |
| १६ | जल | कु. हर्षाली संजय पुसांडे | बी.ए. ३ | १२ |
| १७ | जलसंवर्धनचे महत्व | कु. श्रध्दा रमेश लोखंडे | बी.एस्सी.३ (गणित) | १२ |
| १८ | म्हणी | कु. आयुषी विजय सरवैय्या | बी.एस्सी. ३ (बायो) | १४ |
| १९ | मी थेंब एक पाण्याचा | कु. कविता किसन चक्रे | बी.कॉम. ३ | १४ |
| २० | जलव्यवस्थापन काळाची गरज | कु. अंजली सुखदेव आडे | बी.ए. ३ | १५ |
| २१ | जलसंवर्धनाचे फायदे | कु. चेतना केशव राठोड | बी.ए. १ | १६ |
| २२ | पाणी | कु. प्रतिक्षा ज्ञानेश्वर ठाकरे | बी.ए. १ (अ) | १७ |
| २३ | मी आहे पाणी | धम्मपाल समाधान दंदे | बी.ए. १ (अ) | १७ |
| २४ | वनसंरक्षण | कु. चेतना केशव राठोड | बी.ए. १ | १८ |
| २५ | जलसाक्षरता | कु. समृध्दी अविनाश निंबाळकर | बी.ए. २ (कला) | १९ |
| २६ | जलसाक्षरता व्यवस्थापन काळाची गरज | संदिप सुभाष पवार | बी.ए. १ (अ) | २० |
| २७ | कविता | ऋषिकेश रमेश गावंडे | बी.एस्सी.१ (गणित) | २० |
| २८ | जलसाक्षरता | कु. साक्षी दिलीप बोरले | बी.ए. १ | २१ |
| २९ | जल | कु. अंजली रमेश माळवे | बी.ए. १ | २१ |
| ३० | जलव्यवस्थापन काळाची गरज | कु. कोमल अरुण चव्हाण | बी.कॉम. १ | २२ |
| ३१ | पाण्याचा काळजीपूर्वक वापर | कु. पुजा विलास दारव्हेकर | बी.ए. १ | २२ |
| ३२ | तहान | शाम सिताराम बिडवाल | बी.ए. १ | २३ |
| ३३ | जलसाक्षरता | कु. जान्हवी ज्ञानेश्वर बोरकर | बी.ए. २ | २३ |
| ३४ | जलसाक्षरता | कु. अंकीता पुरुषोत्तम बोरोकार | बी.ए. १ (ब) | २४ |
| ३५ | जलसाक्षरता | कु. वैष्णवी मोहन भबुतकर | बी.ए. १ | २४ |
| ३६ | थेंब एक पाण्याचा | कु. विरेका अमरसिंग चव्हाण | बी.ए. २ | २५ |
| ३७ | जलसाक्षरता | कु. महिमा विनय जाधव | बी.एस्सी. ३ | २५ |
| ३८ | जलसाक्षरता | कु. अश्विनी लक्ष्मण गव्हाणे | बी.ए. १ | २६ |
| ३९ | जलसाक्षरता काळाची गरज | अमोल धनराज राठोड | बी.ए. १ | २७ |

## ✻ हिन्दी विभाग ✻


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जल साक्षरता अभियान | कु. कविता किसन चक्रे | बी.कॉम. ३ | २८ |
| २ | जलसंवर्धन | कु. नेहा फारुख गोंडील | बी.कॉम. ३ | ३० |
| ३ | जलसंरक्षण | कु. दिपाली सुनिल बंगाळे | बी.कॉम. ३ | ३० |
| ४ | पानी | कु. आयुषी विजय सरवैय्या | बी.एस्सी. ३ (बायो) | ३१ |
| ५ | जल है तो कल है | कु. विरेका अमरसिंग चव्हाण | बी.ए. २ | ३१ |
| ६ | जल | साहील ईब्राहीम बालापुरे | बी.एस्सी. ३ (बायो) | ३१ |
| ७ | जल | कु. वैष्णवी राजेंन्द्र बानपुरे | बी.एस्सी. ३ (बायो) | ३२ |
| ८ | जलसंवर्धन | गौरव कैलास विडूळकर | बी.कॉम. २ | ३२ |
| ९ | जलसाक्षरता | कु. रेखा डांगरकर | बी.ए. २ | ३२ |
| १० | जल ही जीवन | अमोल धनराज राठोड | बी.ए. १ | ३३ |
| ११ | एक एक बूंद बचाओ | अभिजीत विनोद राठोड | बी.ए. १ | ३३ |
| १२ | पानी की किमत | धम्मपाल समाधान दंदे | बी.ए. १ (अ) | ३३ |
| १३ | पानी ओ पानी | जनार्दन दिलीप राठोड | बी.ए. १ | ३४ |
| १४ | ना तो तुम रखो याद | तौफीक नजीनखाँ पठाण | बी.ए. १ (अ) | ३४ |
| १५ | जल ही है जीवन हमारा | कु. साक्षी राजेन्द्र चौधरी | बी.ए. ३ | ३५ |
| १६ | जलसंरक्षन | कु. निकीता किशोर आडे | बी.कॉम. २ | ३५ |
| १७ | जलसाक्षरता | कु. समृध्दी अविनाश निंबाळकर | बी.कॉम. ३ | ३६ |
| १८ | तरस जाओगे बुंद बुंद को | कु. संस्कृती संतोष तायडे | बी.ए. १ | ३६ |


## English Section


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Water Conservation | Ku. Kavita Kisan Chakre | B.Com. III | 37 |
| 2 | Water Conservation | Asthma Farhat Shaikh | B.Sc. III (Bio) | 38 |
| 3 | Save Water | Sandip Subhash Pawar | B.A. I | 39 |
| 4 | Conserve Water | Ku. Ankita Gajanan Laturkar | B.Com. III | 39 |
| 5 | Water | Ku. Aayushi V. Sarvaiyya | B.Sc. III (Bio) | 39 |
| 6 | Water's Work | Ku. Ankita Gajanan Laturkar | B.Com. III | 39 |
| 7 | Time Calls to Save Water | Ku. Manisha S. Bhagat | B.A. III | 40 |
| 8 | Save Water save Life | Ku. Sima Sanjay Chavan | B.A. I | 41 |
| 9 | Water Conservation | Ku. Pratiksha Thakare | B.A. I | 41 |
| 10 | Water all Around us.... | Ku. Roshani D. Khope | B.A. I (A) | 41 |
| 11 | Water is Everything | Ku. Nikita Kishor Ade | B.Com. II | 42 |
| 12 | Save Water save Life | Zeenat Ikram Khan | B.A. I | 42 |
| 13 | Save Water | Ku. Mamta Sanjay Rathod | B.Com. II | 42 |
| 14 | I am Water | Ku. Roshani D. Khope | B.A. I (A) | 42 |
| 15 | Water & Life | Himmat Arjun Jadhao | B.A. I (A) | 43 |
| 16 | Water | Ku. Punam S. Dhangar | B.A. I | 43 |
| 17 | Water Conservation | Taufik Pathan / Abhijit Rathod | B.A. I (A) | 43 |
| 18 | Save Water | Ku. Nikita Vilas Tile | B.A. I | 43 |
| 19 | Water Conservation | Ku. Chetna Keshav Rathod | B.A. I | 44 |
| 20 | Conserve Water | Narayan Shankar Salodkar | B.A. I | 44 |
| 21 | Save Water | Ku. Sneha G. Wankhade | B.A. II | 44 |
| 22 | Save Water | Ku. Veereka A. Chavhan | B.A. II | 44 |
| 23 | Water Literacy | Samruddhi A. Nimbhalkar | B.A. II | 45 |
| 24 | The Water | Ku. Ankita S. Dhavne | B.A. I (B) | 45 |
| 25 | Save Water Save Lffe | Ku. Ankita Purushottam Borokar | B.A. I (B) | 45 |
| 26 | Save Water | Ku. Sharda Keshav Ukande | B.A. II | 46 |
| 27 | Water is Everything | Ku. Vaishali L.S. Ingole | B.A. I | 46 |
| 28 | Water Everyday | Sahil Ibrahim Balapure | B.Sc. III (Bio) | 46 |
| 29 | Water & Life | Shyam Sitaram Bidwal | B.A. I (A) | 47 |
| 30 | One Drop | Saurabh Madhukar Thakare | B.A. I | 47 |
| 31 | Save Water | Ku. Rekha Dangarkar | B.A. II | 47 |
| 32 | The Water | Ku. Pranali Umesh Thakare | B.A. I (A) | 47 |
| 33 | Save Water | Ku. Rani Ramrao Dangarkar | B.A. I (A) | 48 |
| 34 | Water is Everything | Ku. Vaishali L.S. Ingole | B.A. I | 48 |

महाविद्यालयातील विविध उपक्रम आणि महाविद्यालयाचे यश ............. पृष्ठ क्र. ४९ ते ६०



या अंकात प्रकाशित झालेल्या साहित्यातील मतांशी संपादक, सहसंपादक व प्रकाशक (प्राचार्य) सहमत असतीलच असे नाही.

# वरिष्ठ महाविद्यालय

## मराठी विभाग



# वर्तमान काळासाठी वाणी आणि भविष्यकाळासाठी पाणी जपून वापरा

**संजय सिताराम बिडवाळ**
**बी.ए. भाग-१ (अ)**

सध्या सगळीकडे पाण्याचा दुष्काळ आहे कित्येकांना तर पिण्यासाठी पाणीदेखील नाही. तर उलट एकीकडे आपल्याला मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होतांना दिसतो. ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' असे आपल्याला कित्येकदा ऐकायला मिळते. परंतू प्रत्यक्षात पाणी कसे अडवावे व कसे जिरवावे याबद्दल थोड्याबहुतांनाच माहिती असते. या संदर्भात विस्तारीत माहिती पाहुया !

पाण्याचे रासायनिक गुणसुत्र आहे म्हणजेच हायड्रोजनचे २ रेणू व ऑक्सिजनचा एक रेणू यांच्या संमीश्रणाने पाण्याची निर्मिती होत असते. सामान्य तापमानाला पाणी द्रव्य अवस्थेत असते. पाणी रंगहीन गंधहीन असुन त्याला स्वतःची चव नसते. अनेक द्रावण पाणी आपल्यात विरघळुन घेतो म्हणून पाण्याला वैश्विक द्रावण म्हणतात. पाण्याला जल, अंबु, पय, उदक, जीवन, सलिल, वारी, नीर, तोय व आप अशी अनेक नावे आहेत. पाण्याशिवाय सजीवांचे जीवन जगणे अशक्यच असते. म्हणूनच पाण्याला जीवन म्हणतात. मानवी शरीरात ६० ते ७०% पाणी असते. निरोगी आरोग्यासाठी शुध्द पाणी अत्यंत उपयुक्त असते.

पृथ्वीच्या एकुण भुपृष्ठभागापैकी ७९% भुक्षेत्र हे जलवेष्टीत आहे. त्यातील बहुतांश भाग हा क्षारयुक्त असल्याने पिण्यायोग्य नाही. ७१% पाण्यापैकी ३% पाण्याचे साठे हे गोड पाण्याचे म्हणजेच पिण्यायोग आहे. या ३% पाण्यापैकी ६१% पाणी स्थायुरुपात म्हणजेच गोठलेल्या जमीनीच्या आत आणि १% पाणी हे भुपृष्ठभागावर म्हणजे नदी, तलाव अशा गोडपाण्याच्या साठ्यात आहे आणि या १% पाण्यापैकी भारतात ४० % पाणी वाहत्यास्वरुपात म्हणजेच नद्यांच्या प्रवाहात आहे. उर्वरीत पाण्याचा वापर आपण कशाप्रकारे करतो हे देखील आपल्याला माहित असेल-

सुर्यमालेतील पृथ्वी हा एकमात्र जलयुक्त ग्रह असुन मानवी वस्तीला अनुकूल आहे. सजीवांच्या निर्मीतीच्या वेळी पहीला सजीव हा पाण्यातच जन्मला असावा असे वैज्ञानिकांचे मत आहे. हेच नाही तर पृथ्वीवरील अत्यंत सुक्ष्म जीवांपासुन ते सर्वात महाकाय जीव हे पाण्यातच आढळतात.

पाण्याशिवाय आपण जीवनाची कल्पनाच करु शकत नाही. मात्र तरीही आजकाल आपल्याला पाण्याचा भरमसाठ अपव्यय होतांना दिसतो. हे थांबवण्यासाठी अनेक समाजघटक कार्यरत आहेत. हेच नाही तर शासनामार्फत देखील विविध उपक्रम व उपाययोजनांद्वारे जनजागृती केली जात असली तरी जनतेचा हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसते.

केंद्रसरकार मार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध योजना –

१. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम

२. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना

३. हर खेत को पाणी

या प्रमाणेच विविध राज्यांनीदेखील जलसाक्षरतेसाठी व पाणी बचावासाठी अनेक योजना आखल्या आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाने – जलयुक्त शिवार योजना, ओरीसा राज्यशासनाने – पाणी पंचायत, तेलंगणा राज्यसरकारने – काकतीय अभियान राबविण्यात येत आहे. एकोणीसाव्या शतकात १९७२ साली भारताला भयावर दुष्काळाला सामोरे जावे लागले. तेव्हापासुनच जलसंवर्धनासाठी विविध योजनांना सुरवात झाली. या अंतर्गत राष्ट्रीय सेवक संघाच्या विविध ४७ उपशाखा कार्यरत आहे. महाराष्ट्रातील एकुण जिल्ह्यांपैकी लातुरसह इतर १२ जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणजेच दुष्काळप्रवण क्षेत्रात मोडतात. या जिल्ह्यामार्फत उपाययोजना सुरु आहे.

पावसाच्या वाहत्या पाण्याला अडवून जमीनीत मुरवण्यासाठी श्री मनोहर धारिया यांनी वनचराई चळवळ सुरु केली. या चळवळी अंतर्गत दरवर्षी ३ लाख बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण केल्या जाते.

सैन्यातुन सेवानिवृत्तीनंतर अण्णा हजारे यांनी सामुहिक प्रयत्नाने जलसंधारण होवू शकते हे आकारास आणले. त्यांनी लोकसहभागातुन ४८ बंधारे, १६ गंबीयन बंधारे तयार केले. यामुळे २८,२०० क्युबीक मीटर पाणी संचयनाला यश मिळाले. कलाक्षेत्रातील सुपरिचीत अमीर खान यांचा 'पाणी फाउंडेशन' प्रयोग देखील महत्वपूर्ण आहे. त्यांची ही संस्था २०१६ साली स्थापन झाली. यामार्फत जलयुक्त शिवार योजनेला सहकार्य मिळाले.

याप्रमाणेच आदर्श गांव म्हणून सुप्रसिध्द असलेले हिवरे बाजार या गावाची प्रगतीपथावरील वाटचाल आपणास प्रेरणादायी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार या गावाला गावाचे सरपंच पोपटराव पवार यांनी मानाचे स्थान मिळवून दिले. गावातील लोकांच्या सहकार्याने त्यांनी ५२ मातीची बांध, ३२ दगडी बंधारे,९ चेकडॅम व ४००० कटूर बांध बांधण्यात यशस्वी झाले. या कारकिर्दीमुळे गावाला २००७ साली नॅशनल ग्राऊंड वाटर राष्ट्रीय जल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गावाचे सरपंच पोपटराव पवार यांना देखील २६ जानेवारी २०२० रोजी पद्मश्री या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

उल्लेखीत उदाहरणांचा उद्देश एवढाच की, आपण सर्वांनी यापासुन प्रेरीत होवून जलसंवर्धनाच्या कार्याला हातभार लावावा. कारण थेंबाथेंबानेच तळं सचते. आपल्या प्रयत्नांनी देखील भविष्यातील कोरडा दुष्काळ टाळला जावू शकतो.

**''जल नही होगा,**
**तो कल नही होगा !''**



# जल हेच जीवन



कु. रचना गजानन मनवर
एम.ए. भाग - १

जीवाची काहिली, दुष्काळाची झळ
पाण्याविन आबाळ सजीवांची

जल नियोजन नको उन्हाळ्यात
जपा जलस्त्रोत वर्षभर

भोंगळते भुई आर्त पाण्याविन
वापरा जपुन सिंचनाने

थेंबाची किंमत तहानला पाणी
वापरावे पाणी आवश्यक

मुबलक साठा येईल हो कामी
पर्जन्याची हमी कोण देई

जलाशय तळी पाणी साठवण
होते बोळवण दुष्काळाची

जल हे जीवन ठसवा मनात
प्रसारं जनात शिकवावा

निर्माल्य कचरा नको पाण्यामधी
प्रदुषित नदी करु नका

लावुनिया वृक्ष पर्जन्य द्या हाळी
मृत्युछाया काळी टाळावया

नसता हो जल जीवन दुष्कर
सुके चराचर सृष्टी सारी

महिमा पाण्याचा सर्वश्रृत असे
करु नका हंस मानवाचे

ऐसे समजावे जल महात्माला
घोर संकटाला हटवावे.

# पर्यावरण दिन



कु. रचना गजानन मनवर
एम.ए. भाग - १

पर्यावरणाच्या दिनाच्या शुभेच्छांचा
सोशल मिडीयातुन पुर आहे
मात्र शुभेच्छा देता घेतनाही
जबाबदाऱ्याचा जणु धूर ओह

वाढत्या पर्यावरणीय विध्वसांची
माणसांनी जाण ठेवायला पाहिजे
अन पर्यावरण दिनाच्या औचित्याने
एक तरी झाड लावयाला पाहिजे

# पाणी



कु. शारदा केशव उकंडे
बी.ए. भाग - २

पाणी असतेच झिरपत कुठेतरी
जमीनीच्याखाली, खडकाच्या आत
झुरझुळत असतेच कुठेतरी
पारदर्शी नितळ, प्रत्येकाच्या काळजात

खोटी असते फक्त पाणी गवसण्याची
खोटी असते फक्त गाणी छेडण्याची
कधी कधी इथे पाणी असेल
हेच वाटत नाही खेर
कधी अभागी पायांना, भेटतच नाही झेर

कधी गवसला झरा
तर पाणी आपल्यासाठी नव्हते
असेही सत्य उमगते
पण म्हणून काय झाले ?
पाणी होते आत झुळझुळत
हे समजल्याने ही थोडे
भिजल्यासारखे वाटते
हे काय कमी झाले ?

# घोटभर पाणी...



कु. संस्कृती संतोष तायडे
बी.ए. भाग - १

सांग न ग आई, ते पाखरु काऊन मेलं ?
लहान असतांनीच त्याले देवानं असं कसं नेलं ?

आई म्हणे, यात देवाचा काई हाथ नाई
तो त त्याच्या लेकराची बरबर काळजी घेई

पिलाचा जीव गेला बाई, घोटभर पाण्यासाठी,
तहान लागली त्याच्या मागे त्याच्या जीव घेण्यासाठी.

पाणी नसलं की, काय होते समजलं ना व तुले,
पाणी सांडू नको म्हटलं की, तू बोलतं राहत मले.

आता पासुन आई मी जपून वापरेल पाणी,
'पाणी हेच जीवन आहे' हे आलं माया ध्यानी.

थोडसं पाणी घराबाहेर पाखरासाठी ठेवू,
पाण्यासाठी कोणाचा गेला नाई पायजे जीव.

एकमेकाची जीरवण्यापेक्षा पाणी जरा जीरवू,
पुढच्या साली टंचाईचा प्रश्न आपण सरवू.

इतका साधा इचार पाच वर्षा आधी आला असता
त आज बिचाऱ्या पिलाचा जीव गेला नसता

# वृक्षसंवर्धन

वृक्ष रक्षण, आपले सरंक्षण
वृक्ष संवर्धन देशाचा विकास
पर्यायाने मानव जातीचा विकास
तुमची साथ, पर्यावरणाचा विकास

# पाणी हेच जीवन



कु. सपना पंजाब परंडे
बी.ए. भाग - ३

पाणी हेच जीवन आहे. पाण्याशिवाय जीवन जगू शकत नाही. पाण्याची गरज माणसालाच नाही तर मुक्या जनावरांना सुध्दा आहे.

पाण्याचे मोल अमृता एवढे आहे. म्हणून त्याचे महत्व आपल्या जीवनामध्ये आहे.

पाण्याची उपयुक्तता लक्षात घेवून पाण्याचे जतन करावे. पाण्याशिवाय कोणीच जगू शकत नाही.

पाण्याची गरज समजून पाण्याचा काटक सरीने उपयोग करावा.

पाण्याचे का महत्व जीवनात अनमोल आहे. पाणी अमृत आहे, पाणी जीवन आहे.

# पाणी



कु. स्नेहा पंजाबराव वानखडे
बी.ए. भाग - ३

पाणी आहे जीवन जगण्याचा आधार
आत्ताच करुन घ्या पाण्याचा विचार
पाणीच आणेल तुमच्या जीवनात बहार
पाणी आहे जीवन जगण्याचा आधार

जल-संवर्धनाची कास मनी धरा
प्रत्येक जीवास जीवन जगण्यास मदत करा
जल-संवर्धनास मानवास संबोधन करा
जल-संवर्धनाची कास मनी धरा

पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा आहे
जीवन जगण्यास पाणी आवश्यक आहे
जल-संर्वधन करण्याची नितांत गरज आहे
जीवन जगण्यास पाणी आवश्यक आहे

पाण्याविना नाही जीवनाचा सार
पाण्यासाठी फिरावे लागणार दारोदार
आत्ताच करुन घ्या विचार
पाणी आहे जीवन जगण्याचा आधार

# जलसाक्षरता-जलसंवर्धन काळाची गरज



कु. कविता किसन चक्रे
बी.कॉम. भाग-३

भारतासारख्या विकसनशील देशात भूगर्भातील पाणी उपसण्यावर कुठलेही फारसे बंधन नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पाणी प्रश्न निर्माण झालेला आहे व आजच स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या ५८ वर्षात ग्रामीण व शहरी भागात शुध्द पेयजल लोकांना मिळत नाही. त्याला कारण आपल्या देशात पाणीप्रश्न हा आज अनेक अंगांनी लक्षवेधी व महत्वाचा विषय झालेला आहे. त्यासाठी असलेल्या पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करण्याबाबत सामाजिक प्रबोधन करणे गरजेचे आहे. कारण पाण्याचे दुर्भिक्ष या गंभीर संकटाकडे अजुनही ग्रामीण व शहरी लोक गांभीर्याने पाहत नाहीत. या संकटावर मात करण्यासाठी समाजात जलसाक्षरता मोहीम राबविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमांची भुमिका अत्यंत महत्वाची व योग्य आहे अशा या संकटावर मात करण्यासाठी सोपी व खर्चाची अशी पाण्याचे पुनर्भरण हा सर्वात कमी खर्चाचा उपाय आहे. याशिवाय इतरही अनेक गोष्टींचा अवलंब जलसाक्षरतेच्या संदर्भात करता येईल.

पाण्याचेच दुसरे नांव 'जीवन' असे आहे. पाण्याशिवाय आपण जगूच शकत नाही. त्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. म्हणजेच जो पर्यंत पाण्याचा वापर सुरक्षित व योग्य पद्धतीने होत नाही. तोपर्यंत पाणी प्रश्न समाप्त होणे अशक्यच आहे. त्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांना याचे महत्व समजले पाहिजे. नाहीतर नजीकच्या काळात फार मोठ्या प्रमाणात पाणी संघर्ष उद्भवणार आहे. म्हणजे शेतीविरुध्द उद्योग, एका तालुका विरुध्द दुसरा तालुका, एका जिल्हयाविरुध्द दुसरा जिल्हा आणि एका राज्य विरुध्द दुसरे राज्य इ. या संदर्भातील कावेरी जलवाटप हा प्रश्न आहेच. यासाठी समाजातील लोकांमध्ये साक्षरता ज्ञान दृष्टिकोन आणि वागणूक यात बदल होणे काळाची गरज आहे. तरच पाण्यासंबंधी योग्य ते वाटप नियोजन होऊ शकेल. यासाठी जल साक्षरता व जलसंर्धन मोहीम राबविणे आवश्यक आहे. जलसाक्षरता याचा अर्थ एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला काहीतरी शिकविते व दुसरे व्यक्ती साक्षर होते असा सरळ अर्थ नसून या सर्व कार्यक्रमाकडे एक परस्पर विचारांचा कार्यक्रम अशा दृष्टिने बघितले पाहिजे. यासाठी संप्रेक्षणाची जी विविध माध्यमे आहेत त्यांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. उदा. रेडिओ, दूरचित्रवाणी, भिंती पत्रके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, तर ग्रामीण भागात ग्रामसेवक, तलाठी आणि सरपंच यांची भुमिका यासंबंधी अत्यंत महत्वाची आहे.

आपल्या देशाची लोकसंख्या १२० कोटीच्यावर गेली आहे. आपल्या देशात सुमारे ५ लाख खेडी आहेत. त्यापैकी ७५% खेड्यात उन्हाळ्यात स्थानिक पाण्याचे स्त्रोत कमी झालेले दिसतात. त्यामुळे महाभयंकर संकटांना तोंड द्यावे लागते. शुध्द पाणी तर सोडाच पण अशुध्द पाणी देखील मिळत नाही. मग कोणत्याही स्थितीत असलेल्या पाण्यासाठी खेड्यातील महिला व पुरुषमार्गाला अनेक किमी ची पायवीट करावी लागते. याला अपवाद लहान मुले व म्हातारे व्यक्ती देखील नाही. त्यातल्या त्यात संबंधी चा अधिक त्रास ग्रामीण महिलांना जास्त प्रमाणात सोसावा लागतो याची फारशी जाणीव शहरी भागातील लोकांना होत

नाही. भारतात पाऊस बऱ्यापैकी पडतो. परंतु अयोग्य नियोजनामुळे पावसाचे पाणी समुद्रात जाऊन मिळते. अशा पाण्याचा पिण्यासाठी व शेतीसाठी फारसा उपयोग होत नाही.

भारतात पाण्याचे योग्य धोरण ठरविण्यासाठी जलआयोग निर्माण केलेला आहे. आयोगाने काही गाईडलाईन दिलेल्या आहेत परंतू तरी देखील पाण्याचे नियोजन करतांना प्रथम ते पिण्यासाठी वापरावे.ते शेतीसाठी आणि शिल्लक असेल तर औद्योगिकीकरणासाठी पाण्याचा वापर करावा. परंतू महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक औद्योगिकीकरणाला आहे व नंतर शेतीसाठी दिले जाते. आज पृथ्वीचे तापमान मोठ्या प्रमाणत वाढत आहे. कारण कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. ग्लोबल वार्मींग मुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. याचा परिणाम म्हणून हळूहळू उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुवाजवळील बर्फ वितळत आहे. त्यामुळे समुद्राच्या पाण्याची पातळी वाढू लागली आहे. याचा देखील गंभीर परिणाम जागतिक पातळी वर होऊ शकेल. याकरिता जलसंवर्धन व जल नियोजल करणे काळाची गरज आहे.

उदा. :-

### १. पाण्याचे पुनर्भरण :-

यात पावसाचे पडणारे पाणी टाकीत साठविणे किंवा भुगर्भातील निरनिराळ्या पद्धती चा वापर करुन मुरविणे. यासाठी आपल्या स्वतःच्या छतावर पडणारे पाणी साठविणे आवश्यक आहे.

### २. वनराई बंधारा :-

सिमेंटच्या रिकाम्या बॅगा घेऊन त्यात दगड, गोटे निरुपयोगी साहीत्य घालुन पोत्याचे तोंड बांधून झऱ्यांना येणारे पाणी अडवायचे असे केले तर दिर्घकाळात असा बंधारा पक्का होतो व असे करणे आर्थिकदृष्टया अतिशय कमी खर्चाचे आहे.

### ३. अंडरग्राऊंड बंधारा :-

यात मुख्यतः छोट्या छोट्या नाल्यांना चर खोदून असे चर सिमेंटयुक्त मातीने भरावयाचे व त्यामुळे पाणी अडविले जातात.

### ४. पाझर तलाव :-

यामुळे पाणी जमीनीत मुरते व त्याचा फायदा विहीरीतील पाणी वाढण्यासाठी होतो.

### ५. दगडीं बंधारा :-

दगडांचा बांध बांधून पाणी अडविणे. यामुळे जमिनीची धूप कमी होवून जमिनीचे सपाटीकरण होते.

### ६. रुफ वॉटर हार्वेस्टिंग :-

यात शेतात एक खड्डा खोदून त्यात दगड-गोटे टाकून त्या खड्यात छतावरचे पाणी साठवायचे व त्यामुळे खड्यातील पाणी स्वच्छ व शुध्द होते. ते पिण्यासाठी किंवा शेतीसाठी वापरता येते.

### ७. पाणी अडवा पाणी जिरवा :-

यामुळे समाजाला पाण्याचे महत्व समजते व पाणी वाया जाणार नाही यासाठी समाजप्रबोधन करावे. अर्थात पाण्याचे जतन करावे, पाणी वावराविषयी जनतेमध्ये जाणिव निर्माण करणे, यालाच खऱ्या अर्थाने 'जलसाक्षरता' अभियान म्हणतात. हा एक पथदर्शक कार्यक्रम सर्व स्थरावर राबविणे आवश्यक आहे. यादृष्टिने पाण्याची बचत करण्यासाठीच्या काही साध्या सोप्या गोष्टी सांगता येतील व त्याची अंमलबजावणी करणे फारसे अडचणीचे नाही.

१. पाण्याचा अतिरीक्त वापर करणे.

२. दात घासतांना पाण्याचा नळ वाहता ठेऊ नये. शॉवर ऐवजी बादलीमध्ये पाणी घेऊनच आंघोळ करावी.

३. शेतकऱ्यांनी शेतीसाठीच्या वेगवेगळ्या पाणी वाचविण्याऱ्या जलसिंचनाच्या योजनांचा वापर करावा.

४. पाण्याचे योग्य व्यवस्थापन व नियोजन कसे करावे यासाठी सार्वजनिक ठिकाणी भिंतीपत्रके व प्रदर्शने भरपूर पाण्याचे महत्त्व पटवून दिले तर खऱ्या अर्थाने जलसाक्षरता अभियान यशस्वी होऊ शकते.

---

# जलसाक्षरता



कु. अंकिता सुधीर धवने
बी.ए. भाग-१ (अ)

शहर आणि ग्रामीण भाग याच्या तुलनेत शहरातील पाण्याचा वापर हा ग्रामीण भागापेक्षा दुपटीने अधिक आहे. गावाच्या तुलनेत शहरातील लोक पाण्याच्या कमतरतेसाठी उत्तरदायी आहे. पाण्याला कारखान्यात तयार करता येत नाही किंवा शेतात उगवता येत नाही. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अतिशय गरजेचे आहे.

सर्व जगता, जाती धर्मात पाण्याला पवित्र मानले गेले आहे. पाणी म्हणजे जीवन आपण म्हणतो, भुतलावर राहणाऱ्या प्रत्येक सजीवाची ती निकड आहे. हिरवी हिरवी शेती, सुंदर नटलेली वनराई, सुंदर सुंदर फुले, पाऊस पाण्यात डूबणे, पोहणे,नदीतील-नाल्यातील मासे मोठी धरणे, प्यायला वापरायला भरपूर पाणी अशी परिस्थीती पाहायला-अनुभवायला कोणाला आवडत नाही.

पण हे सर्व स्वप्न तर नाही ना ! असे वाटल्यावाचून आता राहणार नाही. कारण परिस्थती फार बदलत चालली आहे. पाण्याचे महत्त्व हे अनन्य साधारण आहे. हे विसरुन चालणार नाही.

काय आहे पाण्याचा स्त्रोत ? कुठे आहे तो झरा, ती नदी, ती विहीर, कुठे आहे तो बंधारा ? अहो या साऱ्यांमध्ये पाणी येते कुठून ? तर या सर्व पाण्याचा स्त्रोत म्हणजेच पाऊस.... हो.... हो.... पाऊस....

पाऊस हाच एकमेव स्तोत्र आहे. मग पाऊसच जर आपला मुख्य स्त्रोत असेल तर तो पडतो किती ? दरवर्षी हिवाळा ऋतु संपला की साधारणपणे फेब्रुवारी, मार्च महिना आला की गावो गावी पाण्याची टंचाई सुरु होते. पिण्याचे पाणी मिळणे हे अतिशय कठिण होवून जाते. विहीरी आटतात, बोअर्स कोरडी पडतात. तलावातील जलसाठा कधीच संपलेला असतो. शेतातील पिके दिसेनासी होतात. आम्हाला प्यायला पाणी नाही. टँकर हवा असा गावागावातून नारा सुरु होतो. मग धरणे आंदोलन, हंडा मोर्चा, सभा अशा माध्यमाचा वापर करुन गावकरी त्रस्त होतात.

एखादे वर्ष पावसाच्या दृष्टिने वाईट वर्ष असले तरी आणि चांगला पाऊस पडला तरीही असे का घडते ? याचा मुळापर्यंत जावून शास्त्रशुद्ध अभ्यास करावा. याचे विश्लेषण करावे. तो प्रश्न समुळ समजावून घ्यावा व त्यावर उपाययोजना शोधून काढावी हे संशोधकांचे काम ! हे अभ्यासकांचे काम सामान्य माणसाला एवढेच म्हणावयाचे असते.... मला पाणी हवे ! किमान गरजा भागवू शकेल इतके पाणी. ते ही फार परिश्रम न करता मिळाले पाहिजे.

या सर्व अपेक्षा असणे योग्यच आणि तो अधिकार ही आणि ते मिळण्यासाठी व्यक्तीगत पातळीवर तसेच समाजाच्या गावाच्या पातळीवर प्रयत्न करणे, त्यातून पाणी प्रश्न सुटला नाही तरी त्याची तिव्रता अगदी किमान पातळीवर आणून ठेवणे ही गोष्ट अशक्य कोटीतली नाही. विखुरलेल्या स्वरुपात असे का असेना पण असे स्वप्न उद्भवले आहे. मात्र तरीही हा प्रश्न सोडवण्याच्या प्रयत्नामध्ये एक मोठा अडथळा आहे तो म्हणजे मानसिकतेचा !

शहर आणि ग्रामीण भाग यांच्या तुलनेत शहरातील पाण्याचा वापर हा ग्रामीण भागापेक्षा दुपटीने अधिक आहे. खेड्यामध्ये प्रतिमाणसी ४० लिटर पाण्यामध्ये तरी काम चालून घेतात. पण शहरात यापेक्षा अधिक प्रमाणात पाण्याचा वापर होत आहे. गावाच्या तुलनेत शहरातील लोकच पाण्याच्या कमतरतेसाठी उत्तरदायी आहे. पाण्याला कारखान्यात तयार करता येत नाही किंवा शेतात उगवता येत नाही. यामुळेच असे म्हणावे लागते की, निसर्गाने जे दयायचे ते दिले आहे. अशी ही परिस्थितीत मनुष्य जमीनीच्या आत असलेल्या पाण्याचा शोध घेत असतो आणि आपल्या प्रयत्नांनी त्याला जमिनीवर आणण्याचा प्रयत्न करत असतो. हे मान्यच करावे लागेल. जमीनीच्या खालुन जे पाणी प्राप्त होते तेही आता कमी होत चालले आहे.

# जलसंवर्धन



कु. कविता किसन चक्रे
बी.कॉम. भाग-३

जल म्हणजे जीवन, पृथ्वीवर मुबलक असले तरी त्याची वाटणी मात्र विषम झाली आहे. तसेच हे पाणी मानवासाठी उपयोगी नाही. पृथ्वीवरील एकुण पाण्याच्या साठ्यापैकी ९७% पाणी महासागरात खाऱ्या पाण्याच्या स्वरुपात आहे व ३% पाणी गोड पाण्याच्या स्वरुपात आहे. परंतू ३% पाण्यापैकी २.१% पाणी धन स्वरुपात आहे. त्यामुळे मानवास त्याचा विशेष वापर होत नाही. तर फक्त ०.९% पाण्याचाच जे पाणी नद्या, सरोवरे, विहिरी, तळी इ. च्या स्वरुपात आहे व त्याचाच उपयोग करावा लागतो म्हणून जसजशी लोकसंख्या वाढेल व विकास होईल. तसे गोडे पाणी मिळणे अवघड होईल. ही बाब लक्षात घेवूनच ''संयुक्त राष्ट्र संघाच्या सिरीयाच्या प्रतिनिधीने अशी चेतावनी दिली की, तो दिवस दुर नाही, की ज्या दिवशी एक थेंब पाणी, एक थेंब खनिज तेलापेक्षा ही महाग होईल.''

जागतिक स्तरावर भरलेल्या संमेलनात तर एका देशाच्या प्रतिनिधीने म्हटले की, ''तिसरे महायुध्द झाले तर त्याचे कारण पाणी हेच राहील असे भाकीत त्यांनी केले. एवढी मोठी पाण्याची समस्या भविष्यात निर्माण होणार आहे.''

आपल्या देशात सरासरी १९ हजार कोटी घनमीटर पाणी वापरण्यासाठी उपलब्ध होते. त्यापैकी जवळपास ८६% पाणी नदी, सरोवरे इ. रुपाने प्राप्त केले जाते व बाकीचे भुमीगत जलाच्या रुपाने प्राप्त केले जाते.

लोकसंख्यावाढीमुळे, उद्योगधंद्याच्या आणि जलसिंचन विकासामुळे पाण्याच्या मागणीत वाढ होत आहे. पाण्याच्या उपलब्धतेवर मानवी उद्योग अवलंबून असतात. जगातील उपलब्धतेवर मानवी उद्योग

अवलंबून असतात. जगातील सर्व लोकांना शुध्द, स्वच्छ व आरोग्यदायी पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याच्या वापराचे वितरणाचे योग्य नियोजन करणे जरूरीचे आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्वाचा मानला पाहिज. पर्यावरणात निसर्गतः उपलब्ध असलेल्या या संपत्तीचे योग्य संधारण होण्याची गरज आज नितांत आहे. भुपृष्ठावर उपलब्ध असलेल्या पाण्याचे केलेले व्यवस्थापन म्हणजे जलसंधारण होय. निरनिराळ्या कारणांसाठी उपयुक्त असलेल्या पाण्याचा पुरवठा सर्वकाळ व नियमीत व्हावा व तो फायदेशीर ठरावा यासाठी प्रकल्प राबविने हे जलसंवर्धनाचे आद्य उदिष्ट्य असते.

भारतात जलसंपदा विपुल आहे. तथापि संवर्धन व नियोजनाचा अभाव मात्र प्रकर्षाने जाणवतो. संपूर्ण भुजलाचे पुनर्वधीकरण होऊ शकत नाही. त्याकरिता भुजलसंवर्धन महत्त्वाचे मानले जाते.

## जलसंवर्धनाचे उपाय :-

१. प्रसारमाध्यमातून पाण्याचे महत्व लोकांना समजावून दिले पाहीजे. कायद्याला उपयोग केल्यास होणारे दंड व शिक्षा यांची सर्वांना जाणीव झाली पाहिजे. पाणी ही राष्ट्राची संपत्ती असल्याने कायद्याचे उल्लंघन करणारा देशद्रोही समजा व योग्य ती शिक्षा करावी.

२. भुपृष्ठावर स्वच्छ पाण्याचे स्त्रोत सर्वत्र समान नाही. तेव्हा सर्वांना शुध्द पाण्याचा उपभोग समप्रमाणात घेता येणे शक्य नाही. याकरिता उपलब्ध पाण्याचा वापराचा अतिरेक टाळून आवश्यक तेवढेच जल वापरावे.

३. शेतीकरीता पाटाने पाणी दिल्याने खूप पाणी जमिनीत झिरपून पाण्याचा क्षय होतो. याकरिता ठिंबक सिंचन पद्धत, फवारा, मडका पद्धतीचा वापर करुन जलसंवर्धन करावे.

४. पुरामुळे, अवर्षणामुळे पाणी दुषित होते. याकरिता अवर्षण पुरासारख्या घटना घडू नयेत म्हणून जंगल तोड, चराईवर पूर्ण नियंत्रण आणावे. पावसाचे पाणी वाहून जावू नये. म्हणून सपाटीकरण करणे, बांध बंदीस्ती, कंटूर बंडींग हे राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून नेहमी राबवावित.

५. पिण्यासाठी वापरावयाचे पाणी शक्यतो बंदिस्त असावे. ते शुध्द करुन, जंतुनाशके वापरुन बंद पाईप मधून जलाशयातून आणावे. पाणी दुषित होऊन देणे म्हणजे जलसंवर्धन होय.

६. मोठ्या धरणांमुळे धरणापाठी मागच्या सरोवरात उपजाऊ शेती, नदीकाठच्या वसाहती आदीवासी वरच्या पाण्याखाली जाऊन पर्यावरणास धोका पोहोचतो. याकरिता नर्मदेवरील सरदार सरोवरासारखी मोठी धरणे बांधण्याऐवजी लहान बंधारे बांधल्याने पर्यावरणास सहाय्यकच ठरेल.

७. सरोवराच्या पाण्याची वाफ होते. याकरिता सरोवराच्या पाण्यावर सिटील अल्कोहोलासारखे बाष्पीभवन प्रतीबंधक रसायने वापरावीत.

८. ईस्त्राईल, चीन, जापान या देशांनी अंगीकारलेल्या जलसंवर्धन पद्धतीचा आपण काटेकोरपणे वापर केल्यास पाण्याचा योग्य वापर होऊन पाण्याचे दुर्भिक्ष कमी होण्यास मदत होईल.

# पाणी बचतीचे जीवनमंत्र



**कु. आयुषी विजय सरवैय्या**
**बी.एस्सी. भाग-३ (बायो.)**

१. सध्याचे पालक विद्यार्थ्यांना सोबत पिण्याचे पाणी घरुनच देतात. शाळा सुटतांना विद्यार्थी उरलेले पाणी ओतून देतात. शाळा व्यवस्थापनाने ते पाणी एखाद्या पिंपात जमा करण्याची सूचना विद्यार्थ्यांवर केल्यास, तेच पाणी परिसरातील झाडांना वापरता येईलच, शिवाय पाणी बचतीचे लाखमोलाचे संस्कार विद्यार्थ्यांवर होतील.

२. शक्यतो वॉशिंग मशिनचा वापर टाळावा. समोरुन दरवाजा असलेल्या वॉशिंग मशिनला पाणी कमी लागते. मशिनमध्ये पूर्ण लोड कपडे असेल तेव्हाच तिचा वापर करावा, कारण दोन अर्धा लोड वापरापेक्षा एका पूर्ण लोडला कमी पाणी लागते.

३. शॉवरखाली अंघोल करण्यापेक्षा बादलीचा वापर करावा. शॉवरमधून मिनीटाला दहा लिटर पाणी बाहे पडते. नेहमी कमी पाणी फे कण्याची रचना असणारे शॉवर वापरावा तसेच चार मिनिटांत आंघोळ संपवावी.

४. चालू नळ एका मिनीटांत सहा लिटर पाणी बाहेर टाकतो. त्यामुळे तांदूळ, भाजी, भांडी धुणे आदी कामे नळ चालु ठेवून करण्याऐवजी योग्य मापाच्या भांड्यात पाणी घेवून ते करावे. त्या पाण्याचा पुर्नवापर करावा.

५. जमिनीवर अथवा कुंडीतील झाडाच्या खोडाच्या भोवती मातीवर सुक्या पानाचे, जुने पेपर इ. आच्छादन टाकावे. त्यामुळे झाडांना घातलेल्या पाण्याचे बाष्पीभवन न होता झाडांना कमी पाणी लागते.

६ आंघोळीकरिता टर्कीश टॉवेलऐवजी सुती पंच वापरावेत. टर्किश टॉवेल धुण्यासाठी मोठ्या प्रमाणावार पाणी लागते.

७. आंघोळीनंतर स्वच्छ अंग पुसण्याकरिता प्रत्येकाने स्वतंत्र टॉवेल ठेवावा. तो इतर वेळी वापरु नये. त्यामुळे तो वाळवून पुन्हा वापरता येतो.. त्यामुळे टॉवेल वारंवार धुवावा लागत नाही. पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होत.

८ मोठ्या व्यक्तींनी अंघोळ करतांना घरातील बच्चे मंडळीसुध्दा सोबत घ्यावी. त्यामुळे मुले आंघोळ करतांना पाण्याच्या अपव्यय करतात. ते मोठ्यांच्या उपस्थितीत टाळला जातो. एकत्रित आंघोळीला पाणी कमी लागतो.

९. स्वच्छतागृहामधील फ्लॅश टँकची गळती बऱ्याच वेळा सहज लक्षात येत नाही. त्याकरीता फ्लश वारंवार चेक करणे.

१०. टँकमध्ये अन्नपदार्थाचा रंग टाकावा. जर कमोडमध्ये फ्लश न करता रंगीत पाणी येत असेल तर टँकची दुरुस्ती करुन पाणी वाचवावे.

११. जुना फ्लश टँक बदलून त्याऐवजी आधुनिक पध्दतीचा टँक बसवावा, त्यामध्ये मल व मुत्र यांकरिता स्वतंत्र कळ असते. त्यामुळे मुत्र विसर्जनानंतर फ्लशकरिता कमी पाणी लागते.

१२. अन्न पदार्थ शिजवतांना गरजेनुसार पाणी वापरावे. पाणी तर वाया जातेच, पुन्हा इंधन सुध्दा अधिक लागते.

१३. पाळीव पाण्यांना अंघोळ घालताना, बागेत अथवा झाडाच्या अळीजवळ घालावी. त्यामुळे झाडांना पाणी मिळून पाण्याची बचत होते.

१४. घरगुती कपडे बादलीचा वापर करुन धुतांना शक्यतो कपडे साबण पावडरमध्ये भिजवून ठेवावे. कपडे चांगले स्वच्छ निघतात व पाणी कमी लागते.

१५. घरगुती काम करतांना, ओले हात पुसण्याकरिता छोटे सुती रुमाल वापरावेत. ते वारंवार धुवावे लागतात, पण त्यांनी पाणी कमी लागते.

१६. पलंगावर दिवसभर चादरीवर अंथरण्याकरीता रंगीत जाड रंगचा वापर करावा. त्यामुळे चादर लवकर मळत नाही व सतत धुवावी लागत नाही.

१७. बऱ्याच वेळा हात स्वच्छ असतात. परंतू त्यांना जंतुविरहीत करण्यासाठी सतत पाण्याने धुवावे लागतात, त्याऐवजी औषधी सॅनिटायभर वापरुन हात र्निजंतुक केल्यास पाणी वाचेल.

१८. पाहुण्यांना पिण्यास पाणी देतांना, प्रतिष्ठेचा आव न आणता, तांब्यात पाणी व छोटा पेला समोर ठेवून, आवश्यक तेवढेच पाणी पेल्यात ओतुन द्यावे.

१९. घराच्या बाथरुममधील फरशी प्रत्येक आंघोळीनंतर रबरी वायपर वापरुन कोरडी करावी. त्यामुळे फरशी जास्त दिवस स्वच्छ राहते. ती वरचे वर धुवावी न लागल्यमुळे पाण्याची बचत होते.

२०. स्वयंपाकघरातील दगडी ओटा शक्यतो पाणी टाकुन धुऊ नयेत, तर प्रथम छोट्या व्हायपरने कोरडा करुन ओल्या कपड्याने स्वच्छ करावा.

२१. अन्नपदार्थ शिजवतांना जास्त पाणी टाकले गेल्यास अन्न शिजल्यावर ते पाणी दुसऱ्या वाडग्यात ओतुन घ्यावे. ते सुप म्हणून घ्यावे. पौष्टीक घटक शरीरात जातात. इंधन वाचते व सुमारे आठ ग्लास पाण्याची बचत होते. उदा. भाताची पेग.

## कविता...



**कु. प्रणाली गजानन काटकर**
**बी.ए. भाग-३**

मुळे रुजतात
माती घट्ट धरुन ठेवतात
खोडे वाढतात, लाकुड बनतात
पाणी बहरतात, प्राणवायू सोडतात
फुले फुलतात, सुगंध देतात
फळे पिकतात आनंद देतात
झाडांचे सगळेच कुटूंबीय,
माणसासाठी किती झटतात ?
उन्हातान्हात उभे राहून,
झाड मानवाला सावली देते
चिऊताईचे घरटे झाडांच्या फांद्यात
तिच्या पिलांची चिवचिव घुमतेय कानात
तिची पिले राहील अशीच हसतं खेळतं
झाडांच्या फांद्या राहोत वाऱ्यावर डोलतं.....

## पाणी



**कु. वैशाली एल.एस. इंगोले**
**बी.ए. भाग - १**

पाणी आहे जोपर्यंत
जीवन आहे तोपर्यंत
एकच आधार आहे जगण्याचा
तो थेंब केवळ पाण्याचा

क्षणाक्षणांनी तहानतील
सगळे नसेल जेव्हा पाणी
रे मनुष्य उमजेल तुला तेव्हा
का केली स्वत: जीवनाची हानी

नाही त्याच्या एक स्वार्थ
अन नाही कुठला रंग
मोल कळत नाही तुजला
तर होईल भविष्याचा भंग

दिवसानं दिवस गेले चालत
उपसा होत राहीला खोलवर
तो दिवस नक्की येईल तेव्हा
हातात राहील थेंबभर

मित्रांनो आज सांगतो विनवुन
सांभाळा त्या पाण्याचा भार
मगच येणारा काळ
येणार भविष्य होणार
पाणीदार पाणीदार पाणीदार



# जल हेच जीवन



**स्वप्निल प्रल्हाद राठोड**
**बी.कॉम. भाग - २**

पाण्याचा जपून करा वापर
नाहितर पाण्याचाही करावा लागणार व्यापार
व्यापारासाठी मानव करेल हद्दपार
नाहीतर पाण्याचाही करावा लागणार व्यापार

विनामूल्य देणगी हि निसर्गाने दिली
पण त्याची जाणिव आपल्याला नाही कळाली
सुवर्ण संधी हि मिळाली
जल-संवर्धनाची आज गरज भासली

नाहि कळाला पाण्याचा अंत
पाणी नसेल तर प्रत्येकाला वाटेल खंत
पाण्याचा महत्व सांगून गेले संत
पाण्याविना होईल मानवाचा अंत

पाण्याचा जपून वापर करा
पाण्यात दडलय जीवन सारा
जल-संवर्धनाचा मंत्र खरा
पाण्याचा वापर जपून करा

# जल



**कु. हर्षाली संजय पुसांडे**
**बी.ए. भाग - २**

सदा हमे समझाए नानी
नही व्यर्थ बहाओ पानी
हुआ समाप्त अगर धरा से
मिट जायेगी ये जिंदगाणी.....

नही उगेगा दाना दुनका
हो जायेंगे खेत वीरान
उपजाऊ जो लगती धरती
बन जायेगी रेगिस्तान.....

हरी भरी जहा होती धरती
वही आते बादल उपकारी
खुब गरजते खुब चमकते
और करते वर्षा भारी......

हरा भरा रखो इस जगको
वृक्ष तूम खुब लगाओ
पानी है अनमोल रत्न
तुम एक एक बुंद बचाओ.....



# जलसंवर्धन चे महत्व



**कु. श्रध्दा रमेश लोखंडे**
**बी.एस्सी. भाग-३ (गणित)**

**हवा, पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली मुक्त देणगी आहे. पाणी हे जीवनाश्यक असल्यामुळे पाण्याच्या टंचाईची समस्या सोडवण्याला अग्रक्रम द्यावा लागतो. खेड्यापाड्यांतून ही समस्य फारच बिकट आहे. शहरात ठरावीक वेळी पाणी येत असेल, तर सर्व व्यवहार झटपट उरकुन पाणी भरुन ठेवता येते. पण**

खेड्यापाड्यातील लोकांना घडाभर पाण्यासाठी मैलान्मैल चालत जावे लागते किंवा गावात येणाऱ्या टँकरमधुन कष्टपूर्व पाणी मिळवावे लागते. अर्थातच मिळालेल्या पाण्याचा उपयोग प्रथम पिण्यासाठी व अन्न शिजवण्यासाठी करणे भाग पडते. स्वच्छतेसाठी पाणीच उपलब्ध नसल्यामुळे अस्वच्छतेतून रोगराईचा प्रादुर्भाव झाल्यास नवल काय ? माणसाच्या दैनंदिन व्यवहारासाठी पाण्याची एवढी चणचण भासते, तर शेतीला आणि वनस्पतीच्या वाढीला पाण्याची गरज किती पराकोटीची असेल, याची कल्पना केलेलीच बरी...

वास्तविक, भारत हा नद्यांचा देश आहे. भारताच्या काही भागात पावसाचे पाणीही भरपूर मिळते कोकणात व इतर अनेक ठिकाणी प्रचंड पाऊस पडतो. पावसाळ्यात भारतातील काही नद्यांना पूर येतात. ब्रम्हपुत्रा, गंगा, यमुना, गोदावरी इत्यादी नद्यांना येणाऱ्या पुरांमुळे आजूबाजुच्या प्रदेशाची वाताहत झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत वारंवार येतात. याचा अर्थ असा की, उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी ८०% पाणी वाहून जाते. हे भारताचे दुदैव आहे.

धरण बांधून पाणी अडवणे हा त्यावरचा एक उपाय आहे. तसेच, देशभरच्या नद्या एकमेकांना जोडून नद्यांचे जाळेच निर्माण करण्याची एक योजना सध्या सरकारच्या विचाराधीन आहे. हा फारच मोठा फायदा देणारा उपाय आहे. पण ही योजना अत्यंत खर्चिक आणि खुप वर्षे लावणारी आहे. काही धरणांमुळे काही लोकांची सोय झाली असली तरी अजून असे कितीतरी जिल्हे आहेत की, जिथे उन्हाळ्यात लोकांना थेंबभर पाणी मिळणे मुश्किल होते.

भाक्रा-नानगल, दामोदर व्हॅली, कोयना, नाथसागर, नागार्जुनसागर अशी धरणे भारतात ठिक-ठिकाणी बांधली गेली, ही गोष्ट चांगली आहे. पण धरणांमुळे इतरही काही समस्या निर्माण झाल्या. धरणांमुळे खेड्यापाड्यात वीज पोहोचली हे चांगले झाले पण त्यामुळे विजेवर चालणारे पाण्याचे पंप वापरले जावू लागल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा होउन विहिरी कोरड्या पडल्या. नद्यांचे पाणी धरणांकडे खेचले गेल्यामुळे जलप्रदूषण होवू लागले. गंगा यमुनेसारख्या मोठ्या नद्या इतक्या प्रदूषित झाल्या आहेत की, या शुध्द करण्यासाठी कित्येक हजार कोटी रुपयांच्या योजना आखण्याची गरज निर्माण झाली आहे.

पिण्याच्या पाण्याप्रमाणेच शेतीसाठीही आपल्याला पाण्याची गरज आहे. पाण्यासाठी आपण कितीही विहिरी खोदल्या व कितीही पाण्याचे पंप बसवले, तरी ते सर्व निरुपयोगी ठरणार आहे. कारण जमिनीखालील पाण्याची पातळीच खाली जात आहे. ही पातळी कशी वाढेल हे प्रथम पाहिले पाहिजे. यासाठी दोन योजना तातडीने हाती घेतल्या पाहिजेत. एक म्हणजे मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करणे. झाडे आपल्या मुळ्यांद्वारे जमिनीखाली पाण्याचे झरे धरुन ठेवतात. झाडांची संख्या वाढली तर जमिनीखालील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. सध्या बेसुमार वृक्षतोडीमुळे झाडांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. म्हणून मोठ्या प्रमाणावर झाडे लावली पाहिजेत. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही दुसरी योजनाही युध्द पातळीवर राबवायला हवी. यामुळेही जमिनीखालील पाण्याची पातळी वाढेल. मग झरे, विहिरी, नद्या यांचे पाणी आटणार नाही. पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होईल आणि आपले जीवन खऱ्या अर्थाने बहरु लागेल.



# म्हणी



**कु. आयुषी विजय सरवैय्या**
**बी.एस्सी. भाग-३ (बायो.)**

१. स्वच्छता व शुध्द पाणी हे आहे तंत्र, ग्रामीण आरोग्याचा हाच कानमंत्र.

२. पिण्यासाठी हवे शुध्द पाणी, नाहीतर होईल आरोग्याची हानी.

३. पाणी म्हणजे जीवन, हेच आपले स्पंदन.

४. स्वच्छ पाणी, सुंदर परिसर, जीवन होईल,निरोगी निरंतर.

५. पिण्यासाठी हवे स्वच्छ पाणी, नाहीतर होईल आरोग्य हानी.

६. पाणी शुध्दीकरण नियमित करु सर्वांचे आरोग्य संपन्न करु.

७. पाण्याच्या स्वच्छतेविषयी दक्षता घेवू, सर्व रोगराईना दूर पळवू.

८. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट, गावात येईल आरोग्याची पहाट.

९.पिण्यासाठी हो स्वच्छ पाणी, एकच मंत्र ठेवा ध्यानी.

१०. पाण्याची राखा शुध्दता, जीवनाला मिळेल आरोग्यता

११. पाण्याचे पुनर्भरण, जीवनाचे संवर्धन.

१२. प्रत्येकाचा एकच नारा, पाण्याची काटकसर करा.

१३. थेंब थेंबर वाचवू पाणी, आनंद येईल जीवनाला.

१४. पाणी अडवा, पाणी जीरवा, मोलाचे मानवी जीवन वाचवा, प्राणी जीवन वाचवा, पक्षी जीवन वाचवा.

१५. ठिंबक सिंचनाची किमया न्यारी, कमी पाण्यात उत्पन्न भारी.

१६. थोडे सहकार्य, थोडे नियोजन, पाणी फुलवी आपले जीवन.

१७. आपल्या पाण्याच्या हक्क सोडू नका, पण कुणाचे पाणी तोडू नका.

१८. वाचविल्यास जलसंपदा, सिंचनात होईल फायदा.

१९. बचत पाण्याची गरज काळाची, बचत पाण्याची गरज जीवनाची.

२०. वाचवु  मिळून सारे थेंब थेंब पाण्याचा, हाच एकमेव मार्ग सुखाकडे जाण्याचा.

२१.पाणी बचत म्हणजे पाणी निर्मीती, बचत पाण्याची निर्मीती निसर्गाची.

२२. दुष्काळाची संपविण्या उपत्ती, काळजीने वापरावी जलसंपत्ती.

२३. आता राबवू जलनिती, नको दुष्काळाची भिती.

२४. नविन पिढीचा नवा मंत्र, कमी पाण्यात ज्यादा सिंचन क्षेत्र.

२५. पाणी व्यवस्थापनाची धरुनी कास, शेतकऱ्यांनी साधला विकास.

२६. पाणी जमवा आणि आरोग्य जमवा.

२७. पाणी जमवा आणि निसर्ग जपवा.



# मी थेंब एक पाण्याचा



**कु. कविता किसन चक्रे**
**बी.कॉम. भाग-३**

मी थेंब एक पाण्याचा, मी स्वर जीवन गाण्याचा मला वाचवा, हाच माझ्या ओठी जोगवा. घ्या वसा मला जपण्याचा, मी थेंब एक पाण्याचा मी होऊन झरतो, मी नदीतुन वाहतो, मी जलाशयी थांबतो, मग तहानही भागवतो मी दवबिंदु, अन् मी गंगा, मी सिंधू, मी आनंदाचा, अन् दुःखाचा अश्रूबिंदू, मी ऋतू आणतो रसरसण्याचा.... मी थेंब एक पाण्याचा मी असता मोल न माझे, मी नसता रोप न ताजे माझ्याविण कोरड ओठी, माझ्याविणा गरीब राजे मी हिरवाई.....मी सळसळती तरुणाई..... माझ्यामुळेच फुलतात फुले अन् वनराई... मी नाद ईश्वरा च्या हसण्याचा, मी थेंब एक पाण्याचा विनवून तुम्हा सांगतो पुन्हा सांभाळा या थेंबाला. मी अमृत या जगताचे आहे जपुन ठेवा मजला अडवा जिरवा पण घालवू नका वाया.... माझ्याविना जिवन नाही अन वणवण केवळ पाया. आधारच मी तुमच्या जगण्याचा, मी थेंब एक पाण्याचा....

# जलव्यवस्थापन
## काळाची गरज



**कु. अंजली सुखदेव आडे**
**बी.ए. भाग–३**

पाणी....पाणी....पाणी.... कुठ गेलं पाणी ? कारण आजचे पाणी हे उद्याचे जीवन आहे. माणसाच्या ज्या मूलभुत गरजा आहेत, त्या हवा, अन्न, कपडा, घर व पाणी. त्यापैकी मूलभूत गरज आहे ती पाणी. जलाचे अस्तित्व असणारा आपल्या सुर्यमालेत पृथ्वी हा एक ग्रह आहे. पृथ्वीचा ७१ टक्के भाग जलाचा असून २९ टक्के भाग जमिनीचा आहे. त्यातील ९८ टक्के पाणी क्षारयुक्त असून उर्वरित २ टक्के पाणी गोड्या पाण्याच्या स्वरुपात आहे.

नव्या तत्रांनुसार सागराचे क्षारयुक्त पाणी शुध्द करुन वापरण्यास मध्य–पूर्व राष्ट्रात सुरुवात झालीच आहे. तसेच गंगा,कावेरी नद्या जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भारत सरकारने हाती घेतला आहे. आपण जल उपलब्धता पाहिली. त्यांच्या गरजांचा अंदाज पाहून जलाचे योग्य वाटप झाले पाहिजे. उपलब्ध जलानूसार जलपुरवठ्यासाठी नदीवर धरणे व पाझर तलाव बांधणे, कालवा किंवा नळाचे पाणी पुरवणे, उपसा, जलसिंचन, स्प्रिंकल, ठिंबक सिंचन, डबे व कावडीने पाणी पूरवणे यापैकी स्थानिकदृष्ट्या जी पद्धत योग्य असेल तिचा अवलंब करणे व पाणी पूरवण्याचे प्रमाणही ठरविले जाते.

जल सरंक्षण संवर्धन व विकास यांची शास्त्रीयदृष्ट्या केलेली चिकीसात्मक रचना म्हणजे जलव्यवस्थापन होय. यामध्ये –

१. जलाची उपलब्धता २. गरजांचा अंदाज ३. जल वाटपाचा प्रकार
४. जल व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणींचा आढावा व त्यावर उपाय योजना या सर्व गोष्टींचा विचार व्हावयास हवा.

जागतिक स्तरावर, देश स्तरावर आणि स्थानिक स्तरावर जल उपलब्धतेचे सर्वेक्षण केले जाते. जे जलस्तोत्र आहेत. त्यात वर्षभर असणारे पाणी ऋतूमानानूसार जल प्रमाणात होणारा बदल व पाण्याचा दर्जा याचा विचार केला जातो. एखाद्या नदीत वर्षभर व ऋतूनूसार कोठे व किती पाणी उपलब्ध असते ? त्या नदीला पाणी कोठून येते ? नदीप्रमाणेच नैसर्गिक तळी व तलावांचा विचार होतो. नैसर्गिक तळी क्षारयुक्त असल्याने त्याचा उपयोग होतो. तसेच प्रदूषणामुळे नदी व तळ्यांचा पाण्याचा दर्जा कमी होतो. भरपूर पाण्याची उपलब्धता म्हणून गंगा, सिंधू, गोदावरी, नर्मदा, कावेरी, ब्रम्हपुत्रा, कृष्णा ही खोरी भारतातील खोरी प्रसिध्द आहेत.

भावी जीवनासाठी विचार करता काही उपाय योजना करता येतील.

१. नव्या जलस्त्रोतांचा शोध घेणे. २. पाण्याच्या उपलब्धतेनूसार शेती व उद्योगांचे नियोजन करणे.

३. जल वापरात घट करणे. ४. पाणी वाया जावू देवू नये. ५. प्रदूषण रोखणे

६. परिसरात वनीकरण करणे. ७. पावसाचे घरावर व छतावर पडणारे पाणी योग्य त्यारितीने साठवून वापर करणे.

८. जल वाटपासाठी वा संरक्षण नी सवंर्धनासाठी योग्य तंत्र व साधने वापरणे.

९. जन जागृती करणे, प्रभात फेऱ्या काढणे, वर्तमान पत्रात लेख प्रसिध्द करणे, चित्र प्रदर्शन भरवणे, घोषवाक्य तयार करणे, पथनाट्य सादर करणे.

या वरील सर्व गोष्टींचा विचार करता निश्चितच जलव्यवस्थापन होईल. यात मुळीच संदेह नाही.

# जलसंवर्धनाचे फायदे



कु. चेतना केशव राठोड
बी.ए. भाग-१

आता आपल्या पिढीला हे पाणी पुरेल नंतर आपल्या समोरच्याच काय हे प्रश्न आम्हाला नेहमीच पडत असतो आपण काय करतो आता आपल्याला नळाचं नवीन पाणी भरायचं आहे म्हणून आपण आपल्या घरात असलेलं पाणी फेकुन देतो आपल्या वाटते की हे पाणी खराब झालं पण पाणी कधीही शिळा होत नाही आणि नळाला येणारा पाणी ताजं नसतं ते पण पाणी तलावात किंवा विहीरीमध्ये साठवून असतनं, शिळ पाणी आहे असे म्हणून पाणी फेकुन देवून आपण पाणी वाया घालतो हे सगळ्याकळल पाहिजे की, पाणी कधी शिळ होत नाही त्याला वाया घालू नये. आपल्याकडे जेव्हा पाणी पडत म्हणजे पावसाळ्यामध्ये तेव्हा आपण पडणाऱ्या पाण्याचं एकत्रीकरण करुन आपल्या घराजवळील बोर किंवा विहीर याचा पुणर्भर करु शकतो किंवा पावसाळ्यातील पडणाऱ्या पाण्या आडवून शोसखडा करुन त्यात टाकुन आपण आपल्या परिसरातील पाण्याचा साठा करु शकतो त्यामुळे आपल्याला उन्हाळ्यात आपल्या बोराना किंवा विहीरीला पाणी पुरेल आणि त्याचं पुर्नभरण होईल आणि पावसाचं पाणी वाहून पण जाणार नाही अस जर सगळ्यांनी केलं तर आपण !

पाणी वाचवू शकतो पाणी हे जेवढ ग्रामीण भागासाठी आवश्यक आहे. प्याल्यापेक्षा अधिक प्रमाणात नगरीभागात आवश्यक आहे. हे लोकांना कळले पाहिजे. आपण जेव्हा आंघोळ करतो तेव्हा शॉवरने पाणी खुप प्रमाणात वाया जातो बाटलीत घेवून आंघोळ करावी त्यामुळे पाणी वाचून शकतो. आपल्या जागवते, वाचवते हे पाणी पण आपण त्याच पाण्याला वाया घालतो. आपल्याला त्याची किंमत कळत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपण गाड्या धुवायला टाकतो त्यामुळे पाणी खुप प्रमाणात वाया जाते आणि आपले पैसे पण जाते ते आपण घरी धुतले तर आपला व्यायाम पण होतो पाणी वाचते आणि पैस पण. आपल्याला पाणी वाचवने आता खुप गरजेचं झाले आहे. अशा अवस्थेत पाणी कसे वाचवावे असे आपल्याला वाटते. आपण जर शोषखड्डा नाही करु शकतं आणि आपल्याला किमान आपल्या घरावर पडणार तरी पाणी वाचवायचं असेल तर आपण आपल्या छताला पाईप लावून आपल्या घरच्या बाजुल मोठे छिद्र असणारी दगडाची खडग आणून टाकली पाहिजे आणि त्यात हे पाणी सोडले तरी खडकात पाणी मुरते आणि ते पाणी आपल्या घराच्या परिसरात मुरु शकते. आपल्याला आता पाण्याची खुप गरज आहे.

आपण सगळ्यांनी पाणी वाया घालू नये आपल्याला पाणी जेवढ लागत तेवढं वापरलं पाहिजे. पाणी कसेही वापरु नये. पाणी हे आपलं जीवन आहे आणि आपल्या जीवनला चांगल्या पध्दतीने चांगल्या रितीने वापरलं पाहिजे.

पाणी आहे तर आपण आहो ही सृष्टी आहे. हा छान सुंदर हिरवगार निसर्ग आहे.



# पाणी



**कु. प्रतिक्षा ज्ञानेश्वर ठाकरे**
**बी.ए. भाग - १ (अ)**



एक होतं पाणी
त्याची ही कहाणी
देवाची ही कृपा
अन् नारळात पाणी !

एक होतं पाणी
आईची कहाणी
हृदयी तिच्या अमृत
नयनी तिच्या पाणी !

एक होतं पाणी
शेतकऱ्याची कहाणी
आभाळाची आत्म
अन् डोळ्यांत पाणी !

एक होतं पाणी
जगण्याची कहाणी
थेंब थेंब अनमोल
नाही तर उदासगाणी !

एक होतं पाणी
सागराची कहाणी,
भरती आणि ओहटीची
गंमतच न्यारी !

एक होतं पाणी
पावसाची कहाणी,
नद्या, तलाव, सागर
तृप्त झाली धरणी !

एक होतं पाणी
थेंबाची कहाणी,
अती झालं म्हणून
मोल जाणले नाही कुणी !

एक होत पाणी
कुणातही मिसळून जाई
रंग आणि आकाश
सहज सामावून घेई !

एक होतं पाणी
माणसाची कहाणी
अती तिथे माती झाली
साठवले नाही कुणी !

एक होतं पाणी
भविष्य जाणले कुणी
जपले नाही त्याला तर
डोळ्यात येईल पाणी !

एक होतं पाणी
असं म्हणू नये कुणी,
आज आणि उद्या ही
श्रेष्ठ असं हे पाणी !

असं आहे पाणी
जीवनाची गाणी
सुखी-समृध्द जीवनाची
पाण्याची कहाणी !

# मी आहे पाणी...



**धम्मपाल समाधान दंदे**
**बी.ए. भाग-१ (अ)**

मुबलक पाणी
रान नापीक
होईल सुपीक
देण्या मुबलक पीक
मंत्र पाण्याचा
मनी जपुया ... !

रानो रानी पाणी जिरवूया
वारेमाप पीक पिकवूया
पाण्याची आणीबाणी नष्ट करुया
असे स्वप्न साकार करुया... !!

सुजलाम सुफलाम
धरणी करुनि
भारत भूच ऋण फेडूया
सौख्य समाधानाचे जीवन जगया... !!!

# वनसंरक्षण



**कु. चेतना केशव राठोड**
**बी.ए. भाग-१**

महाराष्ट्रात १९७२ नंतरचा सर्वात भीषण दुष्काळ सध्या जाणवू लागला. दुष्काळ हा निसर्ग निर्मीती नसुन मानवाच्या नियोजन शुन्य कृतिचा परिणाम आहे. असे बोलले जात आहे. दुष्काळ निवारण आणि महाराष्ट्राचा समृध्द शाश्वत विकास करण्यासाठी वनलागवडीचे क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात अनेकदा वृक्षलागवडीचे कार्यक्रम राबविले गेले, त्यावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाला परंतू वन लागवडीचे क्षेत्र किंवा जंगल क्षेत्र म्हणावे तेवढे वाढू शकले नाही हे खेदाने नमुद खरावे लागते. राज्याच्या एकुण भौगोलीक क्षेत्राच्या २०.३ टक्के क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. त्यापैकी ५० टक्के क्षेत्रावर जंगल आहे. बीड जिल्ह्याचा विचार केला तर जिल्हात एकुण २५५३८ हेक्टर जंगल व्याप्त क्षेत्र आहे. हे ऐकुण ऐवढे मोठे असुन महाराष्ट्रातील जंगत्व व्याप्त क्षेत्र खुपच कमी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगलव्याप्त क्षेत्र ३३ टक्के असणे गरजेचे आहे. या महत्वाच्या वन संपत्तीने संरक्षणाअभावी महाराष्ट्रातील वृक्षतोड आणि जंगलावरील अनाधिकृत अतिक्रमण यामुळे राज्यात अवर्षण, तापमान वाढ, क्यायमेट चेंज, पाणी टंचाई, दुष्काळ सारखे संकट वाढते आहे. किंबहूनी वाढले आहे. याकडे त्वरीत गांभीर्याने न पाहिल्यास येत्या काही वर्षात महाराष्ट्रात वाळवत होण्यास वेळ लागणार नाही.

वृक्ष आणि वन याच महत्व संत तुकाराम महाराज चारशे वर्षापूर्वी त्यांच्या ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' या अभंगाच्या माध्यमातून सांगितले आहे. त्यासाठी प्रत्येकाने एक झाड लावून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्विकारली तर महाराष्ट्रात भेडसावू लागलेले संभाव्य धोका रोखण्यात मानवाला यश मिळाले आणि त्यातुन चिरंतन श्वाश्वत विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरु शकते. त्यासाठी महाराष्ट्राच्या वन विभागाने सकारात्मक पावले टाकण्याची आवश्यकता आहे. गेल्या काही वर्षापूर्वी महाराष्ट्रातील डोंगरपट्यावर वृक्षलागवडी झाल्या असल्या आणि त्याच्या संवर्धन, संरक्षणाची जबाबदारी आपल्या राज्यकर्त्यांनी घेण्याचे प्रयत्न केले असते तर आजची दुष्काळाची परिस्थिती उदभवली नसती. परंतू विकास आणि समृध्दतेची दृष्टी नसल्यामुळे त्या वनक्षेत्राचा भाग कमी होवू लागला आहे. वाढते औद्योगिक क्षेत्र आणि त्याच्या अतिक्रमणामुळे आजुन किती वृक्षतोड होवून वनक्षेत्राला आपल्याला मुकावे लागेल, हे सांगता येणार नाही. वनसंपदा आणि नैसर्गिक साधनसंपत्ती ही जीवसृष्टीला लाभलेली देणगी आहे. जंगलसंपदा ही मानवी संपत्ता आहे. तेव्हा 'वनश्री हीच धनश्री । वृक्ष लावू घरोघरी' हा ध्यास प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे.

औद्योगिकीकरण व प्रदूषणामुळे आज मानवी समाजापुढे अनेक समस्या उभ्या राहु लागल्या आहेत. वृक्षतोडीमुळे तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत आहे. परंतू पर्जन्यवृष्टी मात्र त्या प्रमाणात होत नाही म्हणून जमिनीवर पाण्याचे साठे आणि भुगर्भातील पाणी पातळी वाढत नाही. ही समस्या आपण समजून घेण्यात का कमी पडत आहोत? हे सरकारने आत्मचिंतन करावे आणि वनसंवर्धन व संरक्षण यासाठी प्रभावी उपाय योजना करण्याची काळजी घेण्यात यावी हे ओळखुन वृक्षारोपण, सामाजिक वनीकरण या योजनांची अंमलबजावनी करुन महाराष्ट्रातील डोंगरवट्टी आणि पडीक वनजमीन क्षेत्रावर मोठ्याप्रमाणात वृक्षलागवड हाती घेवून तीचे रक्षण करण्याची जबाबदारी घेण्यासाठी व्यापक प्रमाणात वृक्षदिंडी, प्रचार मोहिम राबवने आवश्यक आहे. तरच वनीकरणाचे, निसर्गाचे संवर्धन आणि रक्षण होईल हिच काळाची गरज आहे लक्षात घ्यावे.



# जलसाक्षरता



**कु. समृध्दी अविनाश निंबाळकर**
**बी.ए. भाग-२ (कला)**

दरवर्षी २२ मार्चला 'जागतिक जलदिन' साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधुन प्रतिवर्षी १७ माचे ते २२ मार्च हा सप्ताह संपूर्ण राज्यात 'जल जागृती सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येत आहे.

मनुष्यप्राण्याच्या जीवनात पाण्याला असलेले अनन्यसाधारण महत्व पाहुन पाण्याला जीवन असेही म्हटले जाते. पृथ्वीचा तीन-चतुर्थांश भाग पाण्याने वेढलेला आहे. तथापी, हे पाणी खारे असल्याने पिण्यास लायक नाही, आपल्या देशातही उपलब्ध पाणी साठ्याचे प्रमाण विषम स्वरुपात आहे. वाढती लोकसंख्या, पाण्याची भुगर्भातील घटणारी पातळी यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज आहे आणि त्यासठी जलसाक्षरतेची गरज आहे.

पाणी समस्या ही फक्त एक जिल्ह्याची राज्याची किंवा देशाची समस्या राहिलेली नाही तर तिला जागतिक स्वरुप प्राप्त झाले आहे.

पृथ्वीवर भरपुर पाणीसाठा आहे. तो कधीही कमी पडणार नाही. असे सर्वांना वाटत होते. परंतु जसजसा औद्योगिक विकास होवू लागला. वाढत्या लोकसंख्येकडून पाण्याचा वापर वाढू लागला. तसतसा मुबलक पाण्याबाबतचा समज दुर होवू लागला.

जमीनीचा उतार याबरोबरच पिक याची जात त्यासाठी आवश्यक खताचे, पाण्याचे प्रमाण याची माहिती पुरेशा अनुभवासह व यशस्वी प्रयोगासह उपलब्ध आहे.

पावसाच्या पाण्याचे योग्य पद्धतीने नियोजन केले तर पाण्याच्या समस्या कमी करण्यात यश येऊ शकते. गावातील पशुधनसाठी चाऱ्याची स्वतंत्र सोय केली तर चाराबंदी व कुऱ्हाड बंदीचा निर्णय घेण्यास गावकऱ्यांना कोणतीही अडचण वाटू नये. शासनाने सामाजिक वनिकरण, वनशेती, आपरंपारिक, उर्जास्त्रोत यासारख्या योजना आखल्या. त्यांची अंमलबजावणी केली.

छोट्या छोट्या गोष्टीतुनही आपण पाण्याची बचत करु शकतो. पाण्याची बचत म्हणजेच पाण्याची निर्मीती असे म्हटल्यास वागवे ठरु नये. आपण रस्त्याने जातांना नळाच्या तोट्या उघड्या असलेल्या पाहतो. त्यातुनही बऱ्याचदा पाणी वाया जाते. शालेय महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना पाणी बचतीबाबतचे जलसाक्षरतेचे धडे दिले पाहिजे.

शासनाने सामाजिक वनिकरण, वनशेती अपारंपारिक उर्जास्त्रोत यासारख्या योजना आखल्या त्यांची अंमलबजावणी केली. परंतू त्यास अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. जनतेने त्याने उत्स्फु र्त सहभाग नोंदवला असता तर ही धरती सुजलाम, सुफ लाम व्हायला वेळ लागला नाही. काही कारखान्यातुन रासायनिक द्रव्ये बाहेर टाकली जातात. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नाही. ही द्रव्ये गटारामधुन नदीच्या पात्रात जातात. परिणामा नदीचे पाणी प्रदूषित होते. त्यामुळे नदीतील मासे, बेडकी इत्यादी जलचर प्राणी मरण पावल्याच्या घटना आपण अधूनमधुन वृत्तपत्रात वाचत असतो.

# जलसाक्षरता



**कु. समृध्दी अविनाश निंबाळकर**
**बी.ए. भाग-२ (कला)**

बरसतील धुंद आता पाऊसधारा
भिजेल चिंब-चिंब आसमांत सारा
तहानलेल्या मनांना सुखाविल
टपटप थेंबाच येण....
धरतीही गाईल मग पावसाचं गाणं

*बरस बरस, पावसा*
*माझ्या शेतामधी*
*करपु लागली पिके*
*माझ्या उन्हामंदी*

पावसाची सर आता, नुकतीच बरसली
आणि आठवणीची, पाऊल वाट पुन्हा,
एकदा हिरवळली.....

# जलसाक्षरता आणि व्यवस्थापन ही काळाची गरज



संदिप सुभाष पवार
बी.ए. भाग-१ (अ)

